# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः22.03.2024** **वारःशुक्रवार**

---

1.स्टेट बँकेकडून सर्वोच्च न्यायालयात निवडणूक रोख्यांबाबत प्रतिज्ञापत्र दाखल, निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर निवडणूक रोखे खरेदी तपशील प्रकाशित

2.मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसंदर्भातल्या नव्या कायद्याला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

3.विकसित भारत संदर्भातल्या संदेशांचं प्रसारण त्वरित थांबवण्याचे निवडणूक आयोगाचे आदेश

आणि

4.सत्तराव्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचा अहमदनगर इथं आरंभ

**निवडणूक रोखे**

भारतीय स्टेट बँकेनं काल सर्वोच्च न्यायालयात निवडणूक रोखे प्रकरणी प्रतिज्ञापत्र दाखल केलं. निवडणूक रोख्यांबाबत आकडेवारीसह सर्व तपशील निवडणूक आयोगाकडे सादर केल्याचं बँकेनं या प्रतिज्ञापत्रात म्हटलं आहे. यानंतर निवडणूक आयोगानंही काल निवडणूक रोख्यांचा तपशील आपल्या संकेतस्थळावर प्रकाशित केला. निधी देणाऱ्यांची आणि निधी स्वीकारणाऱ्यांची स्वतंत्र यादी आयोगानं जाहीर केली आहे. यामुळे कोणत्या राजकीय पक्षाला कोणत्या व्यक्तीकडून निधी मिळाला हे तपासण्यात मदत होईल.

**सर्वोच्च न्यायालय**

सर्वोच्च न्यायालयानं मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसंदर्भातल्या नव्या कायद्याला स्थगिती द्यायला नकार दिला आहे. लोकसभा निवडणुका तोंडावर आल्या असताना या कायद्याला स्थगिती देऊ शकत नाही असं न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्त यांच्या खंडपीठानं काल स्पष्ट केलं. निवडणूक आयुक्तांच्या निवड समितीचे सदस्य कोण असावेत याबद्दल राज्यघटनेत कोणतेही नियम सांगितलेले नाहीत. तसंच ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू या नव्यानं नेमणूक झालेल्या निवडणूक आयुक्तांबाबत कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

**निवडणूक आयोग**

समाज माध्यमावरच्या विकसित भारत संदर्भातल्या संदेशांचं प्रसारण त्वरित थांबवावं असे आदेश निवडणूक आयोगानं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाला दिले आहेत. लोकसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतरही नागरिकांच्या मोबाइल फोनवर विकसित भारत संदर्भातले संदेश येत असल्याच्या तक्रारी निवडणूक आयोगाकडे दाखल झाल्या आहेत. त्यांची दखल घेत आयोगानं हे आदेश दिले आहेत.

दरम्यान, आचारसंहिता लागू होण्याआधीच संबंधितांना विकसित भारतचे संदेश प्रसारित न करण्याबाबत आपण पत्रं पाठवली आहेत. मात्र यंत्रणा आणि नेटवर्कच्या मर्यादांमुळे त्यांच्यापर्यंत ती पोहोचायला उशीर झाला असण्याची शक्यता आहे असं मंत्रालयानं या आदेशाला उत्तर देताना म्हटलं आहे.

**निवडणूक तयारी**

लोकसभा निवडणुकीच्या मतदानाच्या तयारीसाठी प्रशासकीय कामांनाही आता वेग आला आहे. राज्यात विविध जिल्ह्यांत संबंधित जिल्हाधिकारी बैठका घेऊन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निवडणूकीच्या कामासंबंधी मार्गदर्शन करत आहेत.

रत्नागिरी, सोलापूर, कोल्हापूर इथं जिल्हाधिकाऱ्यांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, कर्मचारी प्रशिक्षण, मतदान केंद्रावरील सुविधा, प्रचार साहित्य, आर्थिक व्यवहार, पथ फेरी, ध्वनीक्षेपकाचा वापर, वाहनांची तपासणी तसंच अन्य घटकांबाबतच्या सूचना दिल्या.

**काँग्रेस**

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं काल ५७ उमेदवारांची यादी जाहीर केली; त्यात महाराष्ट्रातून सात जणांच्या नावांचा समावेश आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातून रविंद्र धंगेकर, लातूरमध्ये शिवाजीराव काळगे, सोलापूरमध्ये प्रणिती शिंदे, कोल्हापूरमध्ये छत्रपती शाहू महाराज, नंदूरबारमध्ये गोवल पाडवी, अमरावतीमध्ये बळवंत वानखेडे, तर नांदेड लोकसभा मतदारसंघातून वसंतराव चव्हाण यांची यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

**मालवेअर**

बनावट वेबसाइट्सच्या माध्यमातून मालवेअरचा मोठ्या प्रमाणात प्रसार होत आहे; ग्राहक केवळ पायरेटेड चित्रपट किंवा दूरचित्रवाणी कार्यक्रम पाहात नाहीत तर ते त्यांच्या डिजिटल उपकरणाशी तडजोड करत आहेत असा इशारा माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी दिला आहे. इंडियन स्कूल ऑफ बिझनेसद्वारे सायबर सुरक्षेबाबत केलेल्या सर्वंकष अभ्यासावरील अहवालाचं प्रकाशन करताना ते काल मुंबईत बोलत होते. तुमचं 'डिजिटल उपकरण' म्हणजे 'दुसरे तुम्हीच' आहात. त्यात तुमची ओळख, तुमचे बँकिंग तपशील, तुमचे मित्र आणि कुटुंबीय यांचा तपशील असतो. प्रौढांविषयीच्या साईट्स आणि जुगाराशी संबंधित जाहिरातींच्या तुलनेत पायरसी साइट्समुळे मालवेअर संसर्गाचा ५९ टक्के जास्त धोका उद्भवतो असा ठळक निष्कर्ष या अहवालात मांडण्यात आला आहे.

आज जागतिक जल दिन आहे. पाण्याच्या बचतीबाबत जागरूकता निर्माण व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्र संघानं १९९२मध्ये झालेल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. पाणी बचतीचा संकल्प का केला पाहिजे ते सांगणारा हा वृत्तांत...

**स्क्रिप्ट**

सर्वसाधारणपणे २२ मार्चपासून वातावरण बदलायला सुरुवात होते. तात्विकदृष्ट्या पावसाळ्याची सुरुवात होण्यासाठी हा दिवस कारणीभूत ठरतो म्हणून संयुक्त राष्ट्र संघानं जागतिक जल दिनासाठी २२ मार्चची निवड केली. शांततेसाठी पाणी ही यंदाच्या जल दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

पाणी ही सजीवांची मूलभूत गरज आहे. इतर सजीव पाण्याचा अपव्यय करत नाहीत. मात्र माणसाला, त्यातही जिथे बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत, पावसाचं प्रमाण चांगलं आहे अशा ठिकाणच्या माणसांकडून पाणीबचतीकडे दुर्लक्ष केलं जातं. आज आहे उद्याचं उद्या बघू अशी बेफिकीरी दिसून येते. आणि ही बेफिकीरीच आता पाणीटंचाईच्या भीषण समस्येचं कारण बनत आहे. पृथ्वीवर ७१ टक्के पाणी असलं तरी पिण्यायोग्य पाण्याचं प्रमाण अल्प आहे. हवामान बदल, पावसाची अनिश्चितता आणि अन्य कारणांमुळे आज जगातल्या अनेक देशांमध्ये पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे पाणी बचत हा कळीचा मुद्दा बनला आहे. वेळीच सावध होऊन आपण सगळे आजच्या जलदिनानिमित्त पाणी बचतीचा संकल्प करूया. आकाशवाणी बातम्यांसाठी मनोज क्षीरसागर पुणे.

**पुरस्कार**

गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या दुसऱ्या स्मृतिदिनानिमित्त मंगेशकर कुटुंबियांच्या वतीनं दिला जाणारा 'दीदी पुरस्कार' गायिका विभावरी आपटे-जोशी यांना ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर आणि डॉक्टर धनंजय केळकर यांच्या हस्ते नुकताच पुण्यात प्रदान करण्यात आला. पंडित हृदयनाथ मंगेशकर, राहुल देशपांडे, भारती मंगेशकर, आदिनाथ मंगेशकर, या कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी झालेल्या 'विश्वमोहिनी लता दीदी' या सांगीतिक मैफिलीत पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी लतादीदींच्या आठवणी जागवल्या.

**निवडणूक राजकीय**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगानं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मुंबईत बैठक झाली. राज्यात महायुतीच्या ४५ जागा निवडून आणण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत असं शिंदे यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितलं.

लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाबाबत महाविकास आघाडीतले घटक पक्ष तसंच वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पक्ष आणि माकपा या मित्रपक्षांशी बोलणी झाली आहेत. येत्या दोन तीन दिवसात जागावाटप आणि उमेदवार जाहीर होतील असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल सांगितलं.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे काल कोल्हापूर, सांगली दौऱ्यावर होते. कोल्हापूर शहर मतदार संघात शाहू महाराज छत्रपती यांना उमेदवारी देण्याचं महाविकास आघाडीनं निश्चित केलं असून त्यांच्या प्रचारासाठी शिवसैनिक पूर्ण ताकदीनं मैदानात उतरतील असं ठाकरे म्हणाले.

अहमदनगर इथं काल सत्तराव्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेला प्रारंभ झाला. काल झालेल्या सामन्यात महाराष्ट्रासह, गतविजेते भारतीय रेल्वे, गोवा, हरियाणा यांनी विजयी सलामी दिली. या स्पर्धेचं उद्घाटन अर्जुन पुरस्कार प्राप्त कबड्डीपटू अशोक शिंदे यांच्या हस्ते करण्यात आलं. या स्पर्धेतून देशाचा कबड्डी संघ निवडला जाणार आहे, ही अभिमानास्पद बाब असल्याचं राज्य कबड्डी संघटनेचे उपाध्यक्ष शशिकांत गाडे यावेळी म्हणाले. चार दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातील ३० संघ सहभागी झाले आहेत. ब गटाच्या सामन्यात काल यजमान महाराष्ट्रानं गुजरातला ४८ विरुद्ध ३१ गुणांनी पराभूत केलं. महाराष्ट्रानं ९ बोनस गुण मिळविले. अ गटात भारतीय रेल्वेनं बीएसएनएल संघाचा ४० विरुद्ध ७ गुण असा धुव्वा उडविला. क गटात गोव्यानं बंगालला तर ड गटात हरियाणानं उत्तराखंडला पराभूत केलं.

**हवामान**

राज्यात काल सर्वात जास्त कमाल तापमान सोलापूर इथं ३९ अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. आज बहुतांश ठिकाणी कोरडं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.